आयएसओ 14001:2013 आयएसएमएस

मुंबई पत्तनची माहिती सुरक्षा धोरण

‘मुंबई पत्तन प्राधिकरण’ हे, अंतर्गत किंवा बाह्य, हेतु पुरस्सर किंवा अपघाती अशा सर्व प्रकारच्या धोक्यांपासून माहितीची गोपनीयता, अखंडता आणि उपलब्धता जपण्यासाठी, सर्वोत्तम प्रक्रिया, तंत्रज्ञान आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने मजबूत सुरक्षा पद्धती व नियंत्रणे राखण्यास कटिबद्ध आहे.

एकूण माहिती सुरक्षा चौकट खालील गोष्टी सुनिश्चित करण्यासाठी स्थापित केली आहे:

- ✓ आवश्यकतेनुसार माहिती उपलब्ध आणि वापरण्यायोग्य असावी. ती माहिती प्रदान करणारी प्रणाली बिघाडाला समर्थपणे तोंड देणारी व त्यातून सावरू शकणारी असेल. (उपलब्धता)
- ✓ ज्यांना ती माहिती जाणून घेण्याचा अधिकार आहे अशा व्यक्तींनाच ती दिली जाईल किंवा उघड केली जाईल (गोपनीयता)
- ✓ माहिती अनधिकृतपणे जाणून घेणाऱ्यांपासून तसेच अनावश्यक बदलांपासून संरक्षित असावी. (अखंडता)
- ✓ व्यावसायिक व्यवहार तसेच संस्थेच्या विविध ठिकाणांदरम्यान किंवा भागीदार/वापरकर्त्यांसोबत होणारी माहितीची देवाणघेवाण विश्वसनीय असावी (सत्यता आणि अस्वीकृती टाळणे)
- ✓ माहिती सुरक्षा व्यवस्थापन प्रणालीमध्ये (ISMS) सतत सुधारणा.

मुंबई पत्तन प्राधिकरणचे सर्व कर्मचारी, ISO 27001:2013 नुसार निर्धारित दस्तऐवजीकृत कार्यपद्धतींनुसार, माहिती सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली (ISMS) आणि कायदेशीर / नियामक आवश्यकतांचे पालन करण्यासाठी खऱ्या अर्थाने वचनबद्ध असतील.